संच : ब

# ८ वी मराठी

महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०.

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र**

**शैक्षणिक प्रगती चाचणी**

**पायाभूत चाचणी २०१७-१८ : इयत्ता - आठवी**

**विषय : मराठी (लेखी)**

**विद्यार्थ्याचे नाव :** ______________________

**शाळेचे नाव :** ______________________ **दिनांक :** / /२०१७

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **प्राप्त गुण :** [ ]

**हजेरी क्रमांक :** [ ] **तुकडी :** ____ **शिक्षकाची स्वाक्षरी** ________ **एकूण गुण :** ५०

---

**प्रश्न १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ______________ २) ______________

३) ______________ ४) ______________

५) ______________ ६) ______________

७) ______________ ८) ______________

९) ______________ १०) ______________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 8th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न २ ते ४ साठी :** हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

नदी डोंगरावरून आली. शहराजवळून वाहायला लागली, तोच तिला दुर्गंधी आली. नदीने नाक मुरडले. ती म्हणाली, ''शी गं बाई! काय हा घाण वास! काय आहे जवळपास?'' पाहते तो काय? शहरातील सांडपाण्याची गटारे! तुरुतुरु धावत होती. घाण वाहून आणत होती. नदीला बिलगायला येत होती.

नदी म्हणाली, ''शी! शी! शी! व्हा दूर कशी. मी आणलंय स्वच्छ पाणी. त्यात तुम्ही येऊ नका. ते गलिच्छ करू नका.''

गटारातले पाणी मळी पडले. बळेच नदीत शिरले. नदीला मळमळायला लागले. बिचारीने ते सहन केले.

नदी वाहत होती. घाण दूर नेत होती. तिने एक गिरकी घेतली. ती थोडी पुढे गेली. तिला आला उग्र वास. व्हायला लागला खूपच त्रास. तिने रोखून धरला श्वास. पाहायला लागली आसपास.

आता नदीला काय दिसले? संथ वाहणारे नाले. तांबूस, काळ्या पाण्याने भरलेले तिच्याकडेच येत असलेले.

नदी म्हणाली, ''अग बाई! हे कसले नाले? डोंगरदऱ्यांतून आले. आनंदाने वाहत आले, तेव्हा होते किती मी शुद्‌ध! अन् झाले किती अशुद्‌ध! छे बाई! नकोच यांची संगत!''

नाले म्हणाले, ''आम्ही तरी काय करू? माणसांनी दिलं ढकलून. आम्ही आलो वाहून. चल आम्हांला दूर घेऊन. माणसांनी लोटले तुझ्याकडे. आता आम्ही जाणार कोठे? तूच आम्हाला कुशीत घे.

नदीचा नाइलाज झाला. दूषित पाणी घेतले. सगळी घाण घेतली. तू वाहून न्यायला लागली. माणसांनी कचऱ्याच्या गाड्या भरल्या. नदीच्या पात्रात रिकाम्या केल्या. जे जे होते टाकाऊ, ते ते घातले नदीला खाऊ.

**प्रश्न २.** स्वच्छ पाणी कोण आणत होते? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) नाले ब) नदी क) गटारे

**प्रश्न ३.** नदी आनंदाने कोठून वाहत आली होती असे तुला वाटते? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण २)

अ) गावागावांतून ब) शहरांतून क) डोंगरदऱ्यांतून

**प्रश्न ४.** नदीचे पाणी अस्वच्छ कोणी केले? (गुण २)

____________________

____________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 8th - B \Proof-II\19-06-17\GJ

## संच : ब

**प्रश्न ५ ते ७ साठी** : हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

काही नावांच्या नुसत्या उच्चरणाने चैतन्य प्रकट होते. अभिमान जागृत होतो आणि आपण आदराने नतमस्तक होतो. स्वत:च्या अलौकिक कर्तृत्वाने विश्वाच्या नभांगणावर आपल्या तेजाने तळपणारा हा तेजस्वी तारा म्हणजे डॉ. जयंत नारळीकर.

तेजाच्या पोटी तेजच जन्माला येते असे म्हणतात. जयंतराव त्याला अपवाद नव्हते. कलावंतांना जन्माला घालणाऱ्या करवीर नगरीने या विज्ञानवंतांला जन्माला घातले तो दिवस होता १९ जुलै १९३८. जयंतरावांचे वडील विष्णुपंत नारळीकर हे विद्या व्यासंगी होते. बनारस हिंदू विद्यापीठात गणिताचे प्राध्यापक असणारे विष्णुपंत नारळीकर हे रँगलर गणिती म्हणून सर्वांना ज्ञात होते. त्यांच्या मातोश्री सुमतीबाई या सुविद्य होत्या. उभयतांच्या विद्वत्तेचा आणि व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव छोट्या जयंतावर पडत होता आणि त्याचे व्यक्तिमत्त्व फुलत होते.

'ज्ञान हे पुस्तकात असते पण त्याचा प्रत्यय प्रत्यक्ष जीवनात घ्यायचा असतो' या विचारावर श्रद्धा ठेवून जयंतरावांचे माता-पिता त्यांचे लालनपालन करीत होते. कधी पडद्याचं घर बांधून मुलांना तंबूचा अनुभव देणं तर कागदाचे पतंग बनवून या मुलांचे आकाशाशी नाते जोडणे या गोष्टी त्यांचे आईवडील आवर्जून करीत होते. एकदा डोंबाऱ्याचा खेळ पाहून आपणही तसंच चालावं असं मुलांना वाटू लागलं. मग त्यांच्या आईने कल्पकतेने सुताराकडून काठ्यांना दीड फुटावर लाकडी फळ्या जोडून घेतल्या आणि मुलं काठ्या हातात धरून सर्वत्र संचार करू लागली. निखळ वातावरणात जाणीवपूर्वक मुलांचे संगोपन केल्यामुळे त्यांच्या जाणिवांना मोहोर येत होता आणि फुलाप्रमाणे ही मुलं फुलत होती. खेळातही मुलं मागे राहू नयेत यासाठी वडिलांनी अंगणात कुस्तीचा आखाडा तयार करून घेतला होता. बॅडमिंटन आणि क्रिकेट या खेळात जयंतराव आणि त्यांचे बंधू अनंतराव रमत होते.

सगळ्या खेळापेक्षा जयंतरावांना आवड होती ती अंकगणिताची. घरी येणारे मोरूमामा त्यांच्या बुद्धीला चालना मिळेल असे कूटप्रश्न सोडविण्यासाठी येत असत. अशा प्रकारच्या अनौपचारिक शिक्षणातून गणिताची गोडी वाढत होती. सतत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या जयंतने मात्र इंजिनिअर न होता गणितातच संशोधन करायचं ठरवलं.

**प्रश्न ५.** डॉ. जयंत नारळीकर यांना गणित विषयाची आवड कोणामुळे निर्माण झाली? (गुण १)

अ) वडिलांमुळे ब) आईमुळे क) मोरूमामांमुळे

**प्रश्न ६.** जयंतरावांच्या आईवडिलांची कोणत्या विचारांवर श्रद्धा होती? (गुण २)

अ) ज्ञान हे पुस्तकात असते आणि ते पाठ करायचे असते.

ब) ज्ञान हे पुस्तकात असते पण त्याचा प्रत्यय प्रत्यक्ष जीवनात घ्यायचा असतो.

क) ज्ञान हे पुस्तकात असते यावरून प्रश्नोत्तरे सोडवायची असतात.



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 8th - B \Proof-II\19-06-17\GJ

## संच : ब

**प्रश्न ७.** जयंतराव त्यांच्या भावांबरोबर कोणकोणते खेळ खेळत असत? (गुण २)

______________________________________________

______________________________________________

**प्रश्न ८ ते १० साठी** : ही कविता वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

पूर्वी कसा पाऊसकाळ चार महिने असायचा,
हिरवंगार रान पाहून माणूस खुशीत हसायचा.

प्रत्येकाची कणगी भरून धान्य मोप असायचं,
दूधदुभतं, तूप, लोणी याला माप नसायचं.

पसाभरून धान्य तर चिमणीच दारात टिपायची,
पै-पाहुण्यांसाठी माय दिवसरात्र खपायची.

सण जत्रांमधून किती जल्लोष असायचा
भजन कीर्तन करीत गाव आख्खी रात्र बसायचा.

**प्रश्न ८.** पूर्वी कशाला माप नसायचं ते खालील पर्यायातून निवड आणि योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) हिरव्या रानाला     ब) माणसाच्या हसण्याला     क) दूधदुभतं, तूप, लोणी

**प्रश्न ९.** आई पाहुण्यांसाठी रात्रंदिवस कष्ट करायची या अर्थाच्या कवितेतील ओळी लिही. (गुण २)

______________________________________________

______________________________________________

**प्रश्न १०.** गावातील लोक सण कसे साजरे करायचे ते लिही. (गुण २)

______________________________________________

______________________________________________

______________________________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 8th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न ११ ते १३ साठी** : हा लेख वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

> शाळा सुरू झाली. सुट्टीही संपली. आता परत शाळा सुरू झाल्या की परत अभ्यास. पण तोच अभ्यास आपण नियमित करतो का? तर बहुतेक मुलांच्या बाबतीत याचे उत्तर 'नाही' असे येते. आणि मग आपण एकदम अभ्यास करतो. यामुळे अवेळी जेवण होते. जास्त जागरण होते. मग ऐन परीक्षेच्या वेळी ताप भरतो आणि आपण आजारी पडतो. यासाठी नियमित अभ्यास केव्हाही चांगला असतो. विशेषत: १० वी, १२ वी च्या मुलांनी विशेष काळजी घ्यायला हवी. वेळेचे नियोजन करायला हवे. इयत्ता दहावीची परीक्षा मार्च, तर बारावीची परीक्षा फेब्रुवारीत सुरू होते. आणखी एक गोष्ट म्हणजे तुम्ही मुले खूप हुशार आहात. सगळ्यांनाच सायकल येते. कमी वयात मोटारसायकल येते. चारचाकी गाडीही येते; पण तुम्ही वाहनांपासून दूर राहा. वयाची अठरा वर्षे पूर्ण होईपर्यंत कोणत्याही वाहनाच्या चावीला हात लावू नका. नाहीतर ऐन वेळी लेखनिकासह परीक्षा द्यावी लागते. यासाठी प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक आहे आणि प्रत्येक गोष्ट करताना विचार करा, चिंतन करा आणि ताण न घेता अभ्यास करा व स्वत:ची काळजी घ्या.

**प्रश्न ११.** इयत्ता दहावीची परीक्षा कोणत्या महिन्यात सुरू हाते?
योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) फेब्रुवारी   ब) मार्च   क) एप्रिल

**प्रश्न १२.** हा लेख वाचल्यानंतर खालीलपैकी काय योग्य आहे असे तुला वाटते. (गुण २)
योग्य पर्यायाला गोल कर.

अ) स्वत:ची काळजी घेऊन नियमित अभ्यास करणे.

ब) या वर्षी मोटार सायकल चालवायला शिकणे.

क) वयाची चौदा वर्षे पूर्ण झाली की लगेच चारचाकी चालविणे.

**प्रश्न १३.** ऐन परीक्षेच्या वेळी आजारी पडण्याची कोणकोणती कारणे लेखकाने सांगितली आहेत? (गुण २)

______________________________

______________________________

______________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 8th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**खालील प्रश्न दिलेल्या सूचनेनुसार सोडव.**

**प्रश्न १४.** 'सदाचार' या शब्दाचा संधिविग्रह खालीलपैकी कोणता? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) सदा + चार

ब) सदा + आचार

क) सत् + आचार

**प्रश्न १५.** पुढील शब्दाचा संधी कर. (गुण १)

अति + आनंद = ____________________

**प्रश्न १६.** खालील वाक्यात अधोरेखित केलेल्या शब्दांऐवजी कंसात दिलेल्या पर्यायांमधून योग्य वाक्प्रचार निवड आणि आवश्यक बदल करून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

(जीव की प्राण असणे, जीव पणास लावणे, जिवापाड जपणे)

चांदणीने लांडग्याशी झुंज देताना प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

____________________________________________

**प्रश्न १७.** खालील शब्दांचा आकारविल्हे क्रम लाव. (वर्णानुक्रम लाव.) (गुण १)

रिमा, करुणा, प्रवीण, कुणाल

____________________________________________

**प्रश्न १८.** खालील वाक्यातील चुकीचे विरामचिन्ह शोध, त्या जागी योग्य विरामचिन्ह वापरून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

मी म्हटलं, 'एक अतिशय कठीण प्रश्न विचारा.'

____________________________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 8th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न १९.** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे सामान्यरूप ओळखून लिही. (गुण १)

अमिनाने पुस्तकामध्ये मोरपिस ठेवले.

______________________________

**प्रश्न २०.** खालील वाक्यातील क्रियाविशेषण अव्यय ओळख व त्या प्रकारचे क्रियाविशेषण अव्यय वापरून दुसरे वाक्य लिही. (गुण २)

उशीर झाल्यामुळे आई भरभर चालत गेली.

क्रियाविशेषण : ______________________________

वाक्य : ______________________________

**प्रश्न २१.** अधोरेखित शब्दाला योग्य विभक्ती प्रत्यय लावून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

सर्वांनी फातिमा अभिनंदन केले.

______________________________

**प्रश्न २२.** खालील प्रसंग वाच व त्याला कंसातील म्हणींपैकी योग्य अर्थाची म्हण निवडून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

(हातच्या कंकणाला आरसा कशाला, अति तेथे माती, कर नाही त्याला डर कशाला)

मधू मित्रांसोबत बागेत खेळत होता. त्यापैकी कोणीतरी पाने-फुले तोडली होती. माळीकाकांनी सर्वांना बोलावले. मुले जायला घाबरत होती. पण मधू जायला तयार होता. त्याच्या मनात होते की ______________________________

______________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 8th - B \Proof-II\19-06-17\GJ

**संच : ब**

**प्रश्न २३.** तुझ्या शाळेत भरविलेल्या विज्ञान प्रदर्शनाचा अहवाल लिही. (गुण ५)



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 8th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न २४.** खाली एक घटना दिली आहे. त्यावर तुझे मत व्यक्त कर. (गुण ५)

'सकाळी दहा वाजले होते. रस्त्याचे खोदकाम सुरू होते. त्यामुळे अर्धा रस्ता बंद होता. सर्व वाहने संथपणे पुढे जात होती. थोड्याच वेळात वाहतुकीची कोंडी झाली. तेवढ्यात एक अँब्युलन्स (रुग्णवाहिका) हॉर्न वाजवत आली. पण तिला पुढे जाता येत नव्हते.' या प्रसंगाबाबत तुझे मत काय ते लिही.



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 8th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न २५.** तुझ्या आवडत्या कवीने तुझ्या शाळेत भरणाऱ्या 'बालकवी-संमेलनाला' यावे म्हणून पत्र लिही. (गुण ५)

■■■



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\ Std 8th - B \Proof-II\19-06-17\GJ*